## थोडक्यात

### कल्याण डोंबिवलीत ३२९ नवे रुग्ण तर १० जणांचा मृत्यू

कल्याण, दि. ३१ (वार्ताहर)- कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात आज पुन्हा ३२९ नव्या रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. तर १० जणांचा मृत्यू झाला असून ३३६ जणांना गेल्या २४ तासांत डिस्चार्ज देण्यात आला आहे. आजच्या या ३२९ रूग्णांमुळे पालिका क्षेत्रातील रुग्णांची एकूण संख्या १९,९६७ झाली आहे. यामध्ये ५७७० रुग्ण उपचार घेत असून १३,८४० रूग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. तर आतापर्यंत ३५७ जणांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. आजच्या ३२९ रूग्णांमध्ये कल्याण पूर्व -६६, कल्याण प.-६५, डोंबिवली पूर्व -१०७, डोंबिवली प-५९, मांडा टिटवाळा ९, मोहना २० तर पिसवली येथील ३ रूग्णांचा समावेश आहे. डिस्चार्ज झालेल्या रूग्णांपैकी १५३ रुग्ण हे टाटा आमंत्रामधून, २० रुग्ण वै.ह.भ.प. सावळाराम महाराज क्रीडा संकुलमधून, ६ रुग्ण बाज आर. आर. रूग्णालयामधून तसेच १ रुग्ण हॉलीक्रॉस रुग्णालयातून डिस्चार्ज झाले आहेत. तर उर्वरित रुग्ण हे इतर रूग्णालयामधून तसेच होम आयसोलेशन मधून बरे झालेले आहेत.

### भिवंडीत गोडावूनमधून ४ लाखांच्या प्लास्टिक दाण्याचा अपहार

भिवंडी, दि. ३१ (वार्ताहर)- 'यु केम प्लास्टिक ट्रेंडिंग' कंपनीच्या व्यापाऱ्याने त्याच्या ४ लाखांच्या प्लास्टिक दाण्याचा माल गोडावून रक्षकाकडे विश्वासाने सोपवला होता.मात्र त्याने मालाचा परस्पर अपहार केल्याची घटना दापोडा येथील प्रितेश कॉम्प्लेक्समधील गोडावूनमध्ये घडली आहे.या अपहार प्रकरणी गोडावून रक्षक प्रसाद कोंडीबा भोरगे याच्याविरोधात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घनश्याम ब्रिजमोहन बगडीया या व्यापाऱ्याने ३ लाख ९८ हजार १२५ रुपये किंमतीच्या प्लास्टिक दाण्याचा माल प्रसादकडे विश्वासाने सोपवला असता त्याने मालाचा परस्पर अपहार केला आहे.या घटनेचा पुढील तपास नारपोली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक पुष्पराज सुर्वे करीत आहेत.

### रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी नेरळमध्ये 'मालेगाव पॅटर्न'

कर्जत, दि. ३१(वार्ताहर) – नेरळ गावातील काही मुस्लीम धर्मीयांनी या वर्षी बकरी ईदसाठी केला जाणार खर्च कोरोनावर मात करण्यासाठी करण्याचा निर्णय घेतला आहे. कोरोनावर यशस्वी मात करण्यात आणि शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी महत्त्वाचा ठरलेला 'मालेगाव पॅटर्न' नेरळमध्ये राबवण्याचा निर्णय घेतला आहे. मालेगावमधील कोरोनावर मात करण्यात यशस्वी झालेला तेथील युनानी मेडिकल कॉलेजचा काढा काही मुस्लिम प्रमुखांनी नेरळमध्ये सर्वधर्मीय जनतेसाठी उपलब्ध करून दिला आहे.मुस्लिम धर्मीय बकरी ईदचा सण मोठ्या प्रमाणात एकत्र येऊन साजरा करतात. मात्र यंदा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बकरी ईद साध्या पद्धतीने साजरी करण्याची सूचना राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. त्यात कोरोनाचे संक्रमण सतत वाढत असल्याने यंदा सर्वच सण-समारंभ साधेपणाने साजरे केले गेले आहेत. त्या अनुषंगाने १ ऑगस्ट रोजी येणारा बकरी ईद सणही मुस्लिम धर्मीयांनी साध्या पद्धतीने साजरा करणार असल्याने ईदच्या निमित्ताने दिली जाणारी कुर्बानी आणि जेवणावळी यांच्यावर होणारा खर्च होणार नाही. तथापि, यंदा कोरोनाच्या संकटाचा सामना करण्यासाठी 'मालेगाव पॅटर्न'चा काढा नेरळकरांसाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

### खा.श्रीनिवास पाटील यांनी केले यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन

कराड, दि. ३१ (वार्ताहर) – दहावीच्या निकालात उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या कराड व पाटण तालुक्यातील विद्यार्थ्यांना खासदार श्रीनिवास पाटील यांनी थेट घरी जाऊन शाब्बासकी देत अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. अनपेक्षितपणे मिळालेल्या या शुभेच्छांनी विद्यार्थ्यांसह पालकही भाराहून गेले. यापुढील शिक्षण घेत असताना पाटील यांच्याप्रमाणेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी होण्याचा मानस अनेक विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केला.पाटण तालुक्यातील गारवडे येथील साक्षी पालेकर या विद्यार्थीनीने दहावीत ९९.४० टक्के गुण मिळवले आहेत. ही माहिती मिळताच खा. पाटील यांनी तिच्या घरी जाऊन तिचे अभिनंदन केले.

### जळगाव-मुंबई विमानाची तिकीट विक्री सुरू

जळगाव, दि. ३१ (प्रतिनिधी) – कोरोनामुळे १० जुलैपासून तात्पुरती स्थगित असलेली जळगाव -मुंबई विमानसेवा २४ ऑगस्टपासून पुन्हा सुरू होणार आहे. यासाठी विमान कंपनीतर्फे नुकतीच तिकिट विक्रीला सुरुवात करण्यात आली आहे.कोरोनाच्या पार्श्वभूमीवर असलेल्या लॉकडाऊनमुळे अगोदरच्या तीन महिने बंद असलेली जळगावची विमानसेवा १ जूनपासून पुन्हा सुरू झाली होती. मात्र, जळगाव जिल्ह्यात दिवसेंदिवस कोरोनाबाधित रुग्णांची संख्या वाढत असल्यामुळे विमान कंपनीतर्फे खबरदारी म्हणून जळगावची विमानसेवा १० जुलैपासून स्थगित करण्यात आली. कोरोनाच्या वाढत्या प्रभावामुळे चार महिन्यांत दोन वेळा सेवा स्थगित करण्याची वेळ विमान कंपनीवर आली. लॉकडाऊनच्या कालावधीतही विमानसेवा सुरू झाली असली तरी जळगाव विमानतळावरून फक्त २० टक्केच प्रवाशांनी विमान प्रवास केला आहे. यामुळे विमान कंपनीचे आठ कोटींच्या घरात नुकसान झाले. यात मुंबई विमानतळावर विमान उतरवण्यासाठी जागा नसल्यामुळे आठवड्यातून फक्त एकदाच मुंबईची सेवा सुरू होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असल्याचेही विमान कंपनीतर्फे सांगण्यात आले. दरम्यान, आता पुन्हा विमानसेवा सुरू करण्यासाठी कंपनीतर्फे तिकीट विक्रीला सुरुवात करण्यात आली असून प्रवाशांना ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष विमानतळावर जाऊनही तिकीट खरेदी करता येणार आहे.

## कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातून १८ गावे वगळली

# १८ गावातील १३ नगरसेवकांचे पद रद्द

**वार्ताहर**

कल्याण , दि. ३१ – केडीएमसी क्षेत्रातून काही दिवसांपूर्वी अधिसूचना द्वारे १८ गावे वगळण्यात आली. या वगळण्यात आलेल्या १८ गावांतील १३ नगरसवेकांचे पद निवडणूक विभागच्या अवाहालानुसार मनपा आयुक्तांनी रद्द केले आहे.

यामध्ये या १८ गावातील नगरसेवक मोरेश्वर भोईर, पिसवली (भाजपा), रमाकांत पाटील गोळवली (भाजपा), नगरसेविका सोनी अहीरे, आशेळे, चिंचपाडा (बसपा), उर्मिला गोसावी, चिंचपाडा, नांदवली (शिवसेना), कुणाल पाटील, आडवली ढोकली (अपक्ष), प्रमिला पाटील, सोनारपाडा (शिवसेना), प्रभाकर जाधव घेसर, निळजे (अपक्ष), दमयंती वझे माणगाव सोनारपाडा (अपक्ष), जालिंदर पाटील उंब्रोली, भाल, दावडी (भाजपा), इंदिरा तरे आशेळेगाव कुष्णनगर (भाजपा), विमल भोईर, मानेरे, वसार (शिवसेना), शैलजा भोईर, हेदुटणे,चोळे, (अपक्ष), सुनिता खंडागळे, गोळवली, पिसवली (भाजपा) या १३ नगरसेवकांचे सदस्यत्व रद्द झाले आहे.

केडीएमसीमध्ये असणाऱ्या २७ गावांपैकी घेसर, हेदुटणे, उंब्रोली, भाल, द्वारली, माणोरे, वसार, आशेळे, नांदिवली तर्फे अंबरनाथ, आडिवली-ढोकळी, दावडी, चिंचपाडा, पिसवली, गोळीवली, माणगाव, निळजे, सोनारपाडा आणि कोळे ही १८ गावे पालिका क्षेत्रातून वगळण्यात आली आहेत. तर उर्वरित आजदे, सागाव, नांदीवली पंचानंद, घारीवली, संदप, उसरघर, काटई, भोपर, देसलेपाडा ही ९ गावे पालिका क्षेत्रातचा ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. दरम्यान सध्या अस्तित्वात असणाऱ्या केडीएमसीतील लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ यावर्षी ११ नोव्हेंबरला संपुष्टात येणार आहे. मात्र त्यापूर्वीच ही कार्यवाही करण्यात आल्याने हे लोकप्रतिनिधी या निर्णयाविरोधात न्यायालयात दाद मागणार आहेत.

पक्षीय बलानुसार भाजपा ५, शिवसेना ३, अपक्ष ४, बसपा १, असे १३ नगरसेवकांचे पद रद्द झाले आहे. तर याबाबत क.डो.म.पा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याशी संपर्क साधला असता १३ नगरसेवकांचे पद रद्द केल्याबाबत दुजोरा दिला.



ठाणे ग्लोबल कोव्हीड रुग्णालयात काम करणाऱ्या परिचारिका व इतर कर्मचाऱ्यांना कोणतीही पूर्व कल्पना न देता कामावरून काढण्यात आल्याने संतप्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी महापालिका मुख्यालयाला धडक देत आंदोलन केले. (छाया:दीपक कुरकुंडे)


### कोविड हॉस्पिटलच्या परिचारिकांना सेवेतून कमी करण्याच्या नोटिसा

ठाणे, दि. ३१ (वार्ताहर)-ठाणे महापालिकेच्या कोविड सेंटरमध्ये काम करत असलेल्या परिचारिकांची सहा महिन्यांसाठी नियुक्ती करण्यात आली असताना त्यांना अचानक ३१ जुलैपासून कमी करण्याच्या नोटिसा देण्यात आल्याने संतप्त झालेल्या परिचारिकांनी ठाणे पालिका मुख्यालयाबाहेर आंदोलन केले. या परिचारिकांना दोन महिन्यांचा पगार देण्यात आला नसून या नोटिसा मागे घेण्याची मागणी परिचारिका यांनी केली. बाळकूम येथिक कोविड सेंटर रुग्णालयात एकीकडे कामासाठी डॉक्टर्स मिळत नसताना ज्या सिस्टर आपल्या चांगल्या नोकऱ्या सोडून कोविड रुग्णालयात काम करण्यासाठी आल्या असताना त्यांच्यावरच बेकार होण्याची वेळ ठाणे महापालिकेने आणली आहे. काही सिस्टरला २८ तारखेला नोटिसा देण्यात आली.

### कोरोना मृतांवर पालिका करणार मोफत अंत्यसंस्कार

कल्याण दि. ३१ (वार्ताहर)- वाढती कोरोना मृतांची संख्या लक्षात घेता कोरोना मृतांवर महापालिका मोफत अंत्यसंस्कार करणार असल्याचे पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले. कल्याण पश्चिमेतील प्रेम ऑटो स्मशानभूमीत गॅसवर चालणारी शवदाहिनी सुरु करण्यात आली. या शवदाहिनीची पाहणी आयुक्तांनी केली ते बोलत होते.

आता आणखी एक शवदाहिनी सुरु झाल्याने महापालिका हद्दीत शवदाहिन्यांची संख्या सहा झाली. डोंबिवलीत पाथर्ली, शिवमंदीर, कल्याणमध्ये बैलबाजार, लाल चौकी, विठ्ठलवाडी याठिकाणी शवदाहिन्यांची सुविधा होती. याकामी ५९.७६लक्ष रू खर्च करण्यात आला असुन या स्मशानभुमीमध्ये नवीन आतिरिक्त ५स्टन्डची शवदाहिनी बांधणे, प्रार्थना सभागृह बांधणे, वाढीव प्रतिक्षालय गॅलरीचे बांधकाम करणे, या कामासाठी १४१.००लक्ष रू खर्च करीत प्रेम ऑटो मुरूबाड रोड स्माशन भुमीत सोयी सुविधा केल्याने स्माशन भुमीचे रुपडे पालटले आहे.



# छातीच्या एक्सरेतूनही कळणार कोरोनाचा संसर्ग

**डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजीचा शोध**
**एक्सरे अपलोड केल्यास मोफत निष्कर्ष मिळणार**

**प्रतिनिधी**

पुणे दि. ३१ – स्वॅब टेस्टसोबतच आता रुग्णांना छातीच्या एक्सरेतूनही कोरोनाचा संसर्ग झाला की नाही हे पाहता येणार आहे. पुण्यातील खडकवासला येथील संरक्षण विभागाच्या डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी (डीआयएटी) या संस्थेने छातीच्या एक्सरेतून कोरोना आहे की नाही याची विनाशुल्क माहिती देणारे तंत्र विकसित केले आहे.

डीआयएटीच्या संशोधक सुनिता ढवळे यांनी हे तंत्र विकसित केले असून पुण्यासह दिल्लीतील डीआरडीओच्या वल्लभभाई पटेल रुग्णालयात या तंत्रज्ञानाची चाचणीही करण्यात आली.कोरोना आहे की नाही, हे जाणून घेण्यासाठी स्वॅब टेस्ट घेतली जाते. त्यानंतर कोरोनाचे निदान होते. शासकीय संस्थामध्येही चाचणी मोफत केली जाते तर खासगी रुग्णालयांमध्ये यासाठी तीन हजार रुपयांपर्यंत शुल्क आकारले जाते. कोरोनाचा विषाणू हा नाकावाटे शरीरात जातो आणि त्यानंतर तो शरीरात मारा करण्यास सुरुवात करतो. स्वॅब टेस्टसोबतच आता रुग्णांना छातीच्या एक्सरेतूनही कोरोनाचा संसर्ग झाला की नाही हे पाहता येणार आहे.डीआयएटीच्या संशोधक सुनिता ढवळे यांनी हे तंत्र विकसित केले असून पुण्यासह दिल्लीतील डीआरडीओच्या वल्लभभाई पटेल रुग्णालयात या तंत्रज्ञानाची चाचणीही करण्यात आली आहे.रुग्णांनी आपला एक्सरे काढल्यानंतर diat.ac.in या वेबसाईटला जावे. तेथे लाल रंगात मुख्य पेजवर एनेबल कोवीड- १९ या ऑप्शनला जाऊन आपला एक्सरे अपलोड करायचा आहे. साधारपणे काही सेकंदात सदर रुग्णाला कोरोना आहे का की नाही, याची माहिती मिळते. तसेच काही संशयांस्पद लक्षणे आढळल्यास तशी सूचनाही रुग्णाला दिली जाते.


**जोस्टस् इंजिनीअरिंग कंपनी लिमिटेड**

सीआयएन क्र. : एल२८१००एमएच१९०७पीएलसी०००२५२
नोंद. कार्यालय : ग्रेट सोशल बिल्डिंग, ६० सर फिरोझशाह मेहता रोड, मुंबई- ४००००१
दूर. क्र. ९१-२२-६२३७८२००,
फॅक्स : ९१ -२२-६२३७८२०१
वेबसाईट : www.josts.com, ईमेल: jostsho@josts.in

**सूचना**

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या कलम ४७(१) (ए) अनुसार कंपनीच्या संचालक मंडळाची सभा ही ३० जून, २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिता कंपनीचा अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात आणि पटलावर घेण्यासाठी मंगळवार, ११ ऑगस्ट, २०२० रोजी घेण्यात येणार आहे. यापुढे, वर नमूद रेग्युलेशन्सच्या कलम ४७(२) नुसार सदर सूचना ही दी बॉम्बे स्टॉक एक्सचेंज लिमिटेड (www.bseindia.com) आणि कंपनी म्हणजेच (www.josts.com) यावर उपलब्ध आहे.

**जोस्टस् इंजिनीअरिंग कंपनी लिमिटेड** करिता
सही/-
स्थळ : मुंबई — प्राजक्ता पाटील
दिनांक : ३१/०७/२०२०


# रुग्णांसाठी तत्काळ लोकल सेवा खुली करा!

## आमदार हितेंद्र ठाकूर यांची पंतप्रधान व रेल्वे मंत्र्यांकडे मागणी

**प्रतिनिधी**

विरार, दि. ३१ -वैद्यकीय सेवेतील करमचाऱ्याना ज्या प्रमाणे लोकल प्रवासाची मुभा देण्यात आली आहे त्याच पद्धतीने हृदय रोग,कॅन्सर,किडनी चां आजार या सारख्या गंभीर व्याधीने त्रस्त असलेल्या रुग्णांनाही मुंबईतील रुग्णालयांमध्ये उपचार घेण्यास जाण्यासाठी लोकल ट्रेनच्या प्रवासाची परवानगी द्यावी,अशी मागणी बहुजन विकास आघाडीचे संस्थापक आणि वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर आणि आमदार क्षितिज ठाकूर यांनी केली आहे.

सध्या कोरोनाच्या प्रादुर्भाव मुळे गेल्या चार महिन्यांपासून देशात लॉक डाऊन सुरू आहे त्याचा परिणाम वसई विरार नालासोपारा भागात सुधा जाणवला मात्र या कठीण काळात बहुजन विकास आघाडीने गोरगरीब मोठ्या प्रमाणावर धान्य वाटप केले तसेच आजारी रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत केली या कठीण काळात वसई विरार नाला सोपारा येथील जनतेच्या पाठी बहुजन विकास आघाडी आणि लोकनेते आमदार हितेंद्र ठाकूर खंबीरपणे उभे राहिले.

मात्र या परिसरातील कितेक गंभीर रुग्णांची मुंबईतील के ई एम,जे जे,टाटा,नायर,भगवती यासारख्या सरकारी रुग्णालयात ट्रीटमेंट सुरू होती पण सार्वजनिक परिवहन सेवा बंद असल्याने रुग्णांचे हाल सुरू होते.यातील बऱ्याच रुग्णांना बहुजन विकास आघाडीने स्थानिक खाजगी रुग्णालयात वैद्यकीय सेवा मिळवून दिले आणि त्यांचे प्राण वाचवले दरम्यान जुलै मध्ये सरकारने अनलॉक ची प्रक्रिया सुरू केली.

याच प्रक्रियाच एक भाग म्हणून अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी लोकल सेवा सुरू करण्यात आली त्यात सरकारी कर्मचारी,तसेच रुग्णालये कर्मचारी यांना लोकल प्रवासाची मुभा देणं न्यात आली पण रुग्णांना मात्र लोकल प्रवास नाकारण्यात आला त्यामुळे केवळ वसई विराराच नव्हे तर मुंबईची उपनगरे तसेच कल्याण डोंबिवली ,अंबरनाथ, आसनगाव,वाशी,बेलापूर पनवेल इथल्या रुग्णांना मुंबईत उपचारासाठी येणे अवघड झाले.

त्यामुळे कित्येकांचा घरातच तडफडून मृत्यू झाला मात्र कुठल्याही पक्षाने याबाबत आवाज उठवला नाही पण बहुजन आघाडीचे आमदार जितेंद्र ठाकूर आणि आमदार क्षितिज ठाकूर यांनी या अन्यायाच्या विरोधात आवाज उठवला हितेंद्र ठाकूर यांनी रेल्वेच्या सर्व बडी अधिकाऱ्यांशी संपर्क भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधून या अन्यायाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.तसेच रुग्णांनाही लोकल सेवा तत्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी थेट पंतप्रधान,रेल्वे मंत्री यांना पत्र लिहून केली क्षितिज ठाकूर यांनीही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना पत्र लिहून हृदय रोग,कॅन्सर किडनी यासारख्या गंभीर आजाराच्या रुग्णांना लोकल प्रवासाची मुभा द्यावी अशी मागणी केली असून या मागणीचा बहुजन विकास आघाडीतर्फे सतत पाठपुरावा केला जात आहे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती करण्यात आली आहे.


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that Late **Shri Bharat Lakhani** and **Mrs. Mamta Lakhani** are members of Kanwal Co.op., HSC LTD., having address at Vasudeva Bldg., 16th Road, Bandra (W), Mumbai - 400 050 and jointly holding five fully shares bearing Nos. 41 to 45, 16 to 20 and 51 and 55, (both are enclosed) under Share Certificate No. 1, 19 and 11 and 14 respectively in respect of Flat Nos. 3,6, and Flat No.4 and Garage Mr. Bharat Lakhani expired at Mumbai-50 (hereinafter called and referred to as DECEASED). The Society is issuing said Shares Certificate Nos as mentioned as above in the name of MRS MAMTA LAKHANI, if any public/person got any objection claim, charge in respect of issue share certificate in the name of Mamta Lakhani the Public/person should contact the above mentioned address within the **15 days** of Publication of this notice, failing which No claim to be admitted and society is free to deal with as per rules and regulations of bye-law of the society.
FOR MERANI AND COMPANY.



**TWIN ROSES TRADES & AGENCIES LIMITED**
Regd. Office: 147, 14th Floor, Atlanta, Nariman Point, Mumbai – 400 021.
CIN: L51900MH1985PLC035214
Website: www.trtal.org.in

NOTICE is hereby given pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, that a Meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Thursday, August 6, 2020 at Mumbai, to inter-alia, consider and approve the Unaudited Financial Results of the Company for the quarter ended June 30, 2020.

This intimation is also available on the Company's website at www.trtal.org.in and on Stock Exchange website at www.bseindia.com.

Pursuant to the Company's "Code to Regulate, Monitor and Report Trading", the Trading Window Close Period has commenced from July 1, 2020 and will end 48 hours after the results are made public on August 6, 2020.

By order of the Board
Sd/-
Place : Mumbai — Bhavin S Mehta
Dated : 31.07.2020 — Company Secretary



**जाहीर सूचना**

आमचे अशील यांच्या वतीने **सूचना** याद्वारे देण्यात येते की, आम्ही खालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत मालमत्तेच्या संबंधात **ॲकॉर्ड इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेड**, कंपनी कायदा, १९५६ च्या तरतूदी अंतर्गत समाविष्ट कंपनी व त्यांचे नोंदणीकृत कार्यालय पत्ता १५-बी, माहिम माता बिल्डींग, मरिनगर कालनी, माहिम (पश्चिम), मुंबई - ४०० ०१६ येथील मालमत्तेच्या हक्कांची पडताळणी करत आहोत.

सर्व व्यक्तींना/ संस्थांना खालील नमूद जागेच्या संबंधात कोणतेही हक्क, अधिकार, दावे, लाभ, मागण्या वा हितसंबंध काही असल्यास तसेच विक्री, अदलाबदल, देणगी, भाडेकरार, परवाना, जप्ती, गहाण, ताबा, भेट, धारणाधिकार, प्रभार, देखभाल, सुविधाधिकार, न्यास, ताबा, सेटलमेंट, करार वा कोणत्याही न्यायालयाचे आदेश वा कंत्राट/ करार, भागीदारी वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे लेखी स्वरूपात दस्तावेज पुरावे यांच्यासह सदर जाहीर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून **७ (सात) दिवसांच्या** आत खालील निर्देशित पत्त्यावर अधोहस्ताक्षरित यांना संपर्क साधावा. सदर दाव्यांच्या संबंधात सदर दावे काही असल्यास ते गृहित धरले जाणार नाहीत व सदर दावे काही असल्यास ते अधित्यागीत वा परित्यागीत मानले जातील.

**अनुसूची :**
**जागेचे विवरण**

फ्लॅट क्र. ९०१, मोजमापित अंदाजे २०५१ चौरस फूट रेरा चटई क्षेत्रफळ, ९ वा मजला, २ (दोन) स्टॅक कार पार्किंग जागेमधील हक्क, मधला मजला व बिल्डींग मांगरीष म्हणून ज्ञात, प्लॉट धारक कॅडास्ट्रल सर्व्हे क्र. ५/७८, माहिम विभाग, अंतिम प्लॉट क्र. ११७०, टाउन नियोजन योजना क्र. ४, ऑफ काशीनाथ धुरु रोड, ऑफ. कॅडेल. रोड, दादर (लोअर माहिम) येथील नोंदणीकरण उप जिल्हा मुंबई व मुंबई येथील मालमत्ता.

**दि. १ ऑगस्ट, २०२०**

इंद्रजीत मिश्रा
भागीदार
(indrajit.mishra@icul.in)
**आयसी युनिव्हर्सल लीगल**
वकील व सॉलिसीटर्स
२०९, हबटाउन सोलारिस,
प्रोफ. एन. एस. फडके मार्ग,
ऑफ वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०६९.



**JAYABHARAT CREDIT LIMITED**
Since 1943
22, Rajabahadur Mansion, 4th Floor, Opp. S.B.I. Main Branch, Near Stock Exchange, Mumbai Samachar Marg, Fort, Mumbai - 400023.

**NOTICE**

Notice is hereby given pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, that the meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Wednesday, August 5, 2020, inter alia, to consider, the Unaudited Financial Results (provisional) of the Company for the Quarter ended 30th June, 2020 at 01.00 P.M. at 17-B, Asaf Ali Road, New Delhi 110002.

For **JAYABHARAT CREDIT LIMITED**
Sd/-
Place: Mumbai — **Arun Mitter**
Date: 30.07.2020 — **Director**


# कोव्हीड रुग्णांच्या उपचारासाठी ठाणे महापालिका आणि ठाणे ग्रामीण असा वाद चिघळणार

**वार्ताहर**

भिवंडी दि.३१-ठाणे जिल्हा ग्रामीण भागात रोजच कोरोना रुग्णांची संख्या बेसुमार वाढत असून त्यातच पावसाळा सुरू असल्याने साथीचे आजार वाढले आहेत.या कोरोनाच्या महामारीमुळे ठाणे जिह्याच्या ग्रामीण भागात रुग्णालयांची सुविधा अपुरी आहे.त्यामुळे ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील जनतेला ठाणे शहर आरोग्य सुविधांसाठी जवळचे व सोयीचे आहे.

मात्र ठाणे महापालिका क्षेत्रात कोरोना रुग्ण वाढत असल्याचे कारण पुढे करून पालिका प्रशासनाने फक्त स्थानिक रुग्णांवरच उपचार केले जातील शहाराबाहेरून आलेल्या रुग्णांना दाखल केले जाणार नाही असा निर्णय ठाणे महापालिका प्रशासनाने घेतला आहे.त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णांची परवड होत आहे.

या निर्णयाने ठाणे ग्रामीण भागातील जनतेमध्ये संताप व्यक्त केला जात असून भिवंडीचे माजी आमदार योगेश पाटील यांनी ठाणे महापालिकेच्या विरोधात आंदोलनाची भूमिका घेतली आहे.याची माहिती देण्यासाठी शुक्रवारी एका पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते.

यावेळी पाटील म्हणाले की ठाणे महापालिका प्रशासनाने शहराबाहेरील रुग्णांवर उपचारास नकार दिला याप्रमाणे त्यांनी ठाणे शहरातील नागरिकांच्या रोजगाराची ,पिण्याच्या पाण्याची तसेच दळणवळणाची सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध करावी.

ठाणे शहरातून हजारो कामगार भिवंडीत गोदामांमध्ये रोजीरोटीसाठी येत आहेत तर ठाणेकरांना पाण्याची पाईप लाईन शहापूर ,भिवंडीतून नेली आहे.तसेच शहराला जोडणारे दळणवळणाचे रस्ते ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातून जोडलेले आहेत.जर ठाणे महापालिका प्रशासनाने कोरोना संकट काळात ठाणे ग्रामीण जनतेवर लादलेला निर्णय तात्काळ मागे न घेतल्यास ठाणे ग्रामीण जनता जशास तसे उत्तर देऊन ठाणे शहरातील कामगारांना भिवंडीत येण्यापासून रोखू तसेच पाणी पुरवठा व ठाणे शहराला जोडणारे रस्ते बंद करून ठाणे पालिका प्रशासनाच्या विरोधात आंदोलन छेडू, असा इशारा माजी आमदार योगेश पाटील यांनी दिला आहे.

# भिवंडीतील आयजीएम रुग्णालयात शंभर बेडचे नॉन कोव्हिड रुग्णालय होणार सुरु-डॉ.मोकाशी

**वार्ताहर**

भिवंडी, दि. ३१ – भिवंडी शहरात कोरोना प्रादुर्भाव वाढत असताना कोरोना बाधित रुग्णांवर उपचार करण्यासाठी शहरातील एकमात्र शासकीय आयजीएम रुग्णालय कोव्हिडं रुग्णालय म्हणून घोषित केल्याने शहरातील गोरगरीब जनतेला आरोग्य सेवा मिळत नसल्याने आयजीएम रुग्णालायत १०० बेड चे नॉन कोव्हिडं रुग्णालय बनविण्यात येत असून येत्या आठवड्या भरात त्याचे काम पूर्ण होऊन ते नागरीकांच्या सेवेत असेल असा विश्वास डॉ नितीन मोकाशी यांनी व्यक्त केला आहे .

भिवंडी या दाटीवाटीची लोकसंख्या असलेल्या शहरात आरोग्य व्यवस्थेचा बट्याबोळ उडाला असताना आरोग्य सेवेतील राजकारणाला कंटाळून शासकीय सेवेला सोडचिठ्ठी दिलेल्या भिवंडी शहरातील ख्यातनाम शल्य चिकित्सक डॉ नितीन मोकाशी यांच्यावर शासनाने कोरोना परिस्थिती हाताळण्यासाठी विशेष जबाबदारी सोपवित त्यांची नियुक्ती भिवंडी महानगरपालिका मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी पदावर केली .डॉ नितीन मोकाशी यांनी पदभार स्वीकारल्या नंतर भिवंडी महानगरपालिका आरोग्य विभागाची झाडाझडती घेत

भिवंडीतील शासकीय रुग्णालय म्हणूनओळखल्या जाणाऱ्या स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयाचे रूपांतर कोव्हिडं रुग्णालयात केल्याने सध्या शहरातील रुग्णांना उपचार मिळणे दुरापास्त झाले असल्याने डॉ नितीन मोकाशी यांनी स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात १०० बेड च्या कोव्हिडं रुग्णालया व्यतिरिक्त १०० बेड चे नॉन कोव्हिडं रुग्णालय बनविण्यास सुरवात केली आहे.

आयजीएम रुग्णालयातील रुग्ण सेवेचा भार ऑरेंज रुग्णलयावर सोपवला असून ऑरेंज रुग्णालयास त्यासाठी शासन भाड्यापोटी लाखो रुपये देत असतानाही आरोग्य सेवा पाहिजे त्या प्रमाणात मिळत नसल्याने नागरीकां कडून ओरड होत असून शासकीय रुग्णालयात महिन्याकाठी ४०० ते ४५० महिलांचे बाळंतपण होत असताना ऑरेंज रुग्णालयात ती संख्या रोडावली असून २०० पर्यंत येऊन ठेपली .त्यामुळे शहरातील गरीब गरजू महिलांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याने आयजीएम रुग्णालयात १०० बेड चे नॉन कोव्हिडं रुग्णालय सुरू केल्याने नागरीकांना त्याचा फायदा होणार असून त्या सोबतच महानगरपालिका क्षेत्रातील १५ नागरी आरोग्य केंद्रात सध्या फक्त लसीकरण कार्यक्रम राबविला जात असून त्या सर्व ठिकाणी प्रत्येकी १० बेडची व्यवस्था करून त्यापैकी ५ बेड बाळंतपणा साठी राखीव व ५ बेड सर्वसामान्य आजारासाठी राखीव राहणार असून नागरीकांना आरोग्य सेवा उपलब्ध झाल्यास आयजीएम रुग्णालयातील बाह्य रुग्ण विभागा सह आरोग्य सेवेवरील भार कमी होण्यास मदत होईल व नागरीकांना ते सोयीचे होईल असा विश्वास डॉ नितीन मोकाशी यांनी शेवटी व्यक्त केला.


**PUBLIC NOTICE**

NOTICE IS HEREBY GIVEN THAT I am **investigating the title of Mrs. Shilpa Avinash Chavan and Smt. Jyotsna Govind Hujare** to the under mentioned premises as **Mrs. Shilpa Avinash Chavan and Smt. Jyotsna Govind Hujare** have **agreed to sell all rights, title and interests** vested in the UNDER MENTIONED PREMISES to my clients namely **Mrs. Rekha Bhikaji Kaskar and Miss Smita Bhikaji Kaskar.**

Any person having any right, title, interest in or objection to or claim over under mentioned premises or any part thereof by way of Inheritance , Succession, Agreement, Contract, Sale, Mortgage, Possession, Gift, Lease, Lien, Charge, Trust, Maintenance, Easement, Bequest, Exchange, Assignment, Tenancy, License, Covenant, Memorandum of Understanding, Family Arrangement, Settlement, Decree or Order of Any Court of Law, Lispendens, Attachment, Any Liability or Commitment or Demand of any nature or otherwise are hereby required to inform/ notify/ make known the same in writing along with the supporting documentary evidence to the undersigned by Registered Post with Acknowledgment Due at **Prabhat Co. Op. Housing Society, Block No. 9, Ground Floor, Sayani Road, Prabhadevi, Mumbai 400 025, within 14 days from the date of publication of this present Notice,** failing which claim/ objection, if any, of any person shall be considered to have been waived and/or abandoned and further the transfer (Sale) in favour of my client shall be completed notwithstanding any such Claims and/ or Objections.

**DESCRIPTION OF THE PREMISES:**

ALL THAT **SHOP bearing No. 15, Ground Floor, admeasuring 265 Sq. Ft. in the building known as Akurli Essbel Co-Operative Housing Society, situated at Plot No.17, RDP-2, MHADA Layout, Lokhandwala Township, Akurli Road, Kandivali(East), Mumbai- 400101** and Constructed on property bearing CTS No. 171/48/40 of Village Akurli situated at Kandivali (East) in the District and Sub District of Mumbai City and Suburban together with 5 shares of Rs. 50 each fully paid of the Akurli Essbel Co-Operative Housing Society Ltd. Comprised in Share Certificate No. 39 and bearing distinctive Nos. 191 to 195 ( both inclusive).

**Dated this 01st day of August, 2020.**

**Sd/-**
**Mr. Nitin Kaskar**
**Advocate**